# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 14 March 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १४ एप्रिल २०२४ दुपारी १.०० वा.

****

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३व्या जयंतीनिमित्तदेशभरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नवी दिल्ली इथं भारतीय जनता पक्षाच्या मुख्यालयामध्ये डॉक्टर आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पांजली अर्पण करुन अभिवादन केलं. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी नागपूरच्या दीक्षाभूमी इथं बाबासाहेबांच्या अस्थिकलशाचं दर्शन घेत अभिवादन केलं. मुंबई इथं दादरच्या चैत्यभूमी या डॉक्टर आंबेडकर यांच्या स्मारकाच्या ठिकाणासह, 'राजगृह' इथल्या निवासस्थानी नागरीक मोठ्या संख्येनं अभिवादनासाठी दाखल होत आहेत. चैत्यभूमी इथं डॉक्टर आंबेडकर यांच्या जीवनावर आधारीत छायाचित्रांचं प्रदर्शन भरवण्यात आलं आहे. राज्यपाल रमेश बैस यांनी चैत्यभूमीवर जाऊन अभिवादन केलं. हेलिकॉप्टर मधून चैत्यभूमीवर पुष्पवृष्टी करण्यात करण्यात आली आहे. नांदेड इथं स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठात कुलगुरू डॉक्टर मनोहर चासकर यांच्या प्रमुख उपस्थितीत अभिवादन करण्यात आलं. छत्रपती संभाजीनगरच्या इथल्या भडकल गेट परिसरातील डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास विविध सामाजिक राजकीय, शैक्षणिक संघटनेच्यावतीनं अभिवादन करण्यात येत आहे. शहरातील महात्मा गांधी मिशन विद्यापीठात आज डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सेंटर फॉर बुद्धीस्ट स्टडीज या केंद्राचं लोकार्पण करण्यात आलं. छत्रपती संभाजीनगर आकाशवाणी केंद्रात अधिकारी-कर्मचा-यांच्या उपस्थितीत डॉक्टर आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पाहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आलं. परभणीच्या जिल्हाधिकारी कार्यालयासमोर डॉक्टर आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी सकाळी नागरीकांनी मोठी रांग दिसून आली. या ठिकाणी भिखू संघाच्या वतीनं सामूहिक महावंदना घेण्यात आली. पंचशील ध्वजारोहण करण्यात आलं तसंच समता दलानं फेरी काढून

अभिवादन केलं. पुस्तक प्रदर्शनाचं आयोजनही यावेळी  करण्यात आलं. बीड इथं शहरातल्या बाबासाहेबांच्या पुर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात येत आहे. अकोल्याच्या अशोक वाटिका इथं भारतीय बौद्ध महासभेतर्फे अभिवादन करण्यात आलं. समता सैनिक दलातर्फे बोधिसत्व भीमराव आंबेडकरांना मानवंदना देण्यात आली. बाबासाहेबांचे नातू आणि वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष विधिज्ज्ञ प्रकाश आंबेडकर यांची यावेळी उपस्थित होते. सातारा, सोलापूर इथंही विविध उपक्रमांद्वारे बाबासाहेबांची जयंती साजरी करण्यात येत आहे.

****

भारतीय जनता पक्षाचा लोकसभा निवडणूक जाहिरनामा- संकल्पपत्र आज नवी दिल्लीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलं. रोजगारासह उद्योजकतेवर भर, मोफत शिधा योजनेला मुदतवाढ , गरीबांसाठी तीन कोटी घरे बांधण्यासह परवडणारं पौष्टिक अन्न तसंच त्यांचा वीज देयकाचा भार कमी करून शून्य करण्याचं आश्वासन यात देण्यात आलं आहे. पाच लाख रुपयांपर्यंत विमा आणि मोफत उपचार, ७० वर्षांवरचे ज्येष्ठ तसंच तृतीयपंथीयांना आयुषमान भारत योजनेचा लाभ देणं, नलिकांच्या वाहिन्यांद्वारे स्वस्त गॅस घरात पोहोचवणं, लखपती दीदी सारख्या योजनांसह महिला सक्षमीकरण, मुद्रा योजना लाभ वाढवणं, 'पीएम किसान' योजना कायम ठेवणं आदी मुद्दे भाजपच्या जाहिरनाम्यात आहेत.

****

सोलापूर जिल्ह्याच्या अकलुज इथं आज माढा लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकी संदर्भात महाअघाडीतील प्रमुख नेत्यांची बैठक सुरू आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सुशील कुमार शिंदे यांच्यासह शेतकरी कामगार पक्षाचे जयंत पाटील, माजी आमदार नारायण पाटील, माजी आमदार रामहरी रूपनवर शिवराज सिंह मोहिते पाटील यांसह निवडणूक उमेदवार धैर्यशील मोहीते पाटील यावेळी उपस्थित आहेत.

****

हिंदी सिनेअभिनेता सलमान खान याची मुंबईत सदनिका असलेल्या वांद्रे परिसरात आज पहाटे पाच वाजेच्या सुमारास गोळीबाराचा प्रकार घडल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.  मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेतर्फे या प्रकरणी तपास करण्यात येत असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे. सलमानला याआधी अनेकवेळा जिवाला धोका असण्याच्या धमक्या देण्यात आल्या आहेत.

****

धाराशिव जिल्ह्यात तीन दिवसांपासून पडत असलेल्या अवकाळी पावसामुळं ३२ गावातल्या ८११ हेक्टर वरील फळबागा आणि पीकं उद्ध्वस्त झाल्याचा प्राथमिक अहवाल महसूल विभागानं शासनाकडे पाठवला आहे. या बाधित झालेल्या गावांतल्या फळबागा आणि पिक नुकसान, पशूधन हानीचे पंचनामे करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. महसूल प्रशासनानं पाठवलेल्या माहितीनुसार जिल्ह्यातल्या तीस गावातलं २१८ हेक्टर जिरायत क्षेत्रातलं पिक तसंच ४० हेक्टर बागायत क्षेत्रातलं पिक आणि ५० हेक्टर वरच्या फळबागांचं या अवकाळीमुळं नुकसान झाल्याचं या प्राथमिक अहवालात म्हटलं आहे. या सोबतच तेरा जनावरं यात दगावली आहेत आणि एका गोठ्याचं नुकसान झालं आहे. नुकसान झालेल्यामध्ये टरबुजाच्या तसंच, आंबा, द्राक्ष या फळबागांचं यात मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. सर्वाधिक नुकसान उमरगा तालुक्यातल्या त्रिकोळी नारंगवाडी या भागात असल्याचं या अहवालात नमुद आहे.

****

मराठवाड्यात आज  तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडेल अशी शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

****